# प्रेस नोट दि.१९/०६/२०२३

## अंमली पदार्थ विरोधी पथकाने एकुण ७,३८,८००/- रुपये किंमतीचा एकुण २९ किलो गांजा हा अंमली पदार्थ जप्त केला.

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुनछपुन होणारा अंमली पदार्थ, ड्रग्स विक्री, साठवणुक व वाहतुकीस पुर्णपणे प्रतिबंध व्हावा करीता मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो यांनी सुचना दिल्या होत्या त्यानुसार मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्रीमती स्वप्ना गोरे सो व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री बाळासाहेब कोपनर सो व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सतिश पवार, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे दि.१८/०६/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील वपोनि श्री. सतिश पवार, पोउपनि श्री. ज्ञानेश्वर दळवी, पोलीस उप-निरीक्षक राजन महाडीक व पोलीस अंमलदार असे तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना **पोलीस अंमलदार सदानंद रुद्राक्षे व रणधीर माने** यांना त्याचे गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, शंकरवाडी, तळेगाव दाभाडे ता.मावळ जि.पुणे येथे लडकत इंडियन ऑईल पेट्रोल पंप शेजारील मोकळ्या जागेत येथे एक इसम मुंबईवरुन गांजा विक्रीसाठी आला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्या वरुन आम्ही सदर ठिकाणी छापा टाकला असता, सदर ठिकाणी इसम नामे मनोज शंकरलाल प्रजापती वय २७ वर्षे रा. वर्धना बँकेजवळ, कळंबोली पनवेल मुळगाव मनादर तहिसल सिगवद जि.सिरोई राज्य राज्यस्थान याचे ताब्यातुन एकुण ७,३८,८००/- रु. किं.चा २९ किलो १५२ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व मोबाईल जप्त करण्यात आला आहे. त्याचे ताब्यात मिळुन आलेला गांजा हा इसम नामे शिवा सिमलीगोडा राज्य ओडिसा पुर्ण नाव पत्ता माहिती नाही याचेकडुन आणला असल्याचे सांगितल्याने सदर इसमांविरुध्द विरुध्द तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदर कारवाईमध्ये ०१ आरोपी अटक करुन त्यांचेकडुन एकुण ७,३८,८००/- रु. किं.चा २९ किलो १५२ ग्रॅम वजनाचा गांजा हा अंमली पदार्थ व मोबाईल जप्त केला आहे.**

सदरची कामगीरी ही मा.पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा.सह पोलीस आयुक्त श्री. डॉ.संजय शिंदे, मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री.वसंत परदेशी, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्रीमती स्वप्ना गोरे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. बाळासाहेब कोपनर, यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश पवार, सहा.पोलीस निरीक्षक प्रशांत महाले, पोउपनि श्री. ज्ञानेश्वर दळवी , पोलीस उप-निरीक्षक राजन महाडीक व पोलीस अंमलदार, पोहवा प्रदिप शेलार, पो.हवा. दिनकर भुजबळ, पो.हवा. आनंद बनसोडे, पो.हवा. संतोष दिघे, पो.ना.संतोष भालेराव, पो.ना. अजित कुटे, पो.ना. प्रसाद कलाटे, पो.ना. विजय दौंडकर, पो.शि. प्रसाद जंगीलवाड, पो.शि. रणधीर माने, पो.शि. सदानंद रुद्राक्षे, पो.शि.कपिलेश इगवे यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड